पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या अधिपत्याखाली वांद्रे (पश्चिम) येथे "सायबर क्राईम डिटेक्शान सेंटर" व पोलीस अधिकारी यांच्याकरिता शासकीय निवासस्थाने यांचे बांधकाम आणि इतर तत्सम मोठी बांधकामे यांकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक : दुरुस्ती-१११८/प्र.क्र.५४/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१८.

शासन निर्णय.-

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या अधिपत्याखाली वांद्रे (पश्चिम), येथे "सायबर क्राईम डिटेक्शन सेंटर" व पोलीस अधिकारी यांच्याकरिता प्रकार-४ ची नऊ सेवा निवासस्थाने यांचे बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई, यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

२. तसेच, कार्यालयीन आदेश, गृह विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१८/ प्र.क्र.४०/ विशा ३(अ), दिनांक १६.०२.२०१८, व्दारे *गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१, २०५५, पोलीस, ११५, पोलीस दलाचे आधुनिकीकरण, (०१) विविध तंत्रज्ञान विकास प्रकल्प, (०१)(०१) विविध तंत्रज्ञान विकास प्रकल्प (२०५५ए०३२)*, याखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात *"५२ यंत्रसामग्री व साधन सामग्री"* या उद्दिष्टाकरिता शिल्लक असलेल्या अनुदानातून रु.५० कोटी इतका निधी *"५३ मोठी बांधकामे"* या उद्दिष्टाकरिता फेरवितरित करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

३. उक्त "सायबर क्राईम डिटेक्शन सेंटर" व पोलीस अधिकारी यांच्याकरिता सेवा निवासस्थाने यांचे बांधकाम आणि इतर तत्सम मोठी बांधकामे करण्यासाठी उक्त रु.५० कोटी खर्च करण्यास, याव्दारे, मंजूरी देण्यात येत आहे.

४. उक्त रक्कम अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई, येथून काढण्यासाठी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई, यांनी उक्त निधी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई, येथून काढून महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई, यांचेकडे द्यावा.

५. उक्त खर्च हा, *गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१, २०५५, पोलीस, ११५, पोलीस दलाचे आधुनिकीकरण, (०१) विविध तंत्रज्ञान विकास प्रकल्प, (०१)(०१) विविध तंत्रज्ञान विकास प्रकल्प (२०५५ए०३२), ५३-मोठी बांधकामे*, याखाली चालू (सन २०१७-१८) वित्तीय वर्षात उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२२८१७४४२१८९२९ असा आहे. हा शासन निर्णय डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2018.02.28 17:46:00 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
४) मा. गृह राज्यमंत्री (शहरे/ ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई.
७) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मुंबई.

प्रत:-

१) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई.
२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई.
५) अवर सचिव (विशा-३अ), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अवर सचिव (अर्थ-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) कार्यासन अधिकारी (व्यय-७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) निवड फाईल, पोल-७.